**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक ३०० । सोमवार ३१ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# देहरेतील मंदिरात चोरी करणारा आरोपी साथीदारासह जाळ्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील देहरे येथील मंदिरांमधील चोऱ्यांचा छडा लावण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. गेल्या ७ वर्षांपासून विठ्ठल व मळगंगा मंदिर चोरी प्रकरणी फरार असलेल्या आरोपीसह त्याच्या साथीदाराला पोलिसांनी अटक केली असून, मांगीरबाबा मंदिरातील चोरीचा गुन्हा उघडकीस आणत मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक १३ ते १४ ऑगस्ट २०२६ दरम्यान देहरे येथील मांगीरबाबा मंदिरातील पितळी घंटा अज्ञात चोरट्याने लांबवली होती. श्रीरंग कचरू जाधव यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान सपोनि हेमंत थोरात यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी संदीप मोहन गांगुर्डे (वय २४) आणि दीपक मोहन गांगुर्डे (वय २६, दोघे रा. देहरे) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी चोरीची कबुली दिली असून, त्यांच्याकडून चोरीची घंटा जप्त करण्यात आली आहे. तपासात आरोपी संदीप हा २०१९ मधील एमआयडीसी पोलीस ठाण्यातील मंदिर चोरीच्या गुन्ह्यात गेल्या ७ वर्षांपासून फरार असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणातील अक्षय गुलाब पवार ऊर्फ पेंढ्या हा आरोपी फरार आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हेमंत थोरात, बापूसाहेब फोलाणे यांच्या पथकाने केली.

# मिरजगाव, नेवासा, राहाता, राहुरीत अवैध गुटखा–मावा विक्रेत्यांवर छापे

## एलसीबीच्या कारवाईत सव्वातीन लाखांचा मुद्देमाल जप्त, १३ आरोपींवर गुन्हे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (एलसीबी) मिरजगाव, नेवासा, राहाता व राहुरीत अवैध मावा, गुटखा आणि सुगंधित तंबाखूची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करून तीन लाख १८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी एकूण १३ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व अंमलदारांच्या चार विशेष पथकांनी रविवारी (दि. ३०) मिरजगाव, नेवासा, राहाता आणि राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच वेळी ८ ठिकाणी छापे टाकले.

या कारवाईदरम्यान सुगंधीत तंबाखू, मावा आणि गुटख्याचा साठा जप्त करण्यात आला असून, जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ३ लाख १८ हजार २८४ रुपये आहे. या प्रकरणी विविध पोलीस ठाण्यांत १३ आरोपींविरुद्ध ■ पान ४ वर



# एमएचटी- सीईटीमध्ये महाघोटाळा?

## हजारो विद्यार्थ्यांचा खाजगी डेटा विकला, १०वी-१२वीत नापास पोरं थेट १०० पर्सेंटाइलवर; अहिल्यानगरातून संभाजी ब्रिगेडची गुन्हा दाखल करण्याची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्राच्या लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारा सर्वात मोठा शिक्षण घोटाळा समोर आला आहे. एमएचटी-सीईटी पीसीएम परीक्षेसाठी अर्ज केलेल्या हजारो विद्यार्थ्यांचा खाजगी डेटा चोरून खासगी सल्लागार संस्थांना विकल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. याच डेटाचा वापर करून पैसे घेऊन गुणताक्रम वाढवून दिला जात असल्याचा गंभीर आरोप संभाजी ब्रिगेड व प्राध्यापक नारायण शिनगारे, अजित खरसडे यांनी केला असून, पोलीस अधीक्षक आणि मुख्यमंत्र्यांकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

प्रा नारायण शिनगारे यांनी दिलेल्या माहितीनुसार हा प्रकार अत्यंत संघटित आहे. २०२२ मध्ये पहिल्या १०० मधील फक्त २% विद्यार्थी असे होते ज्यांना १०वी-१२वीला ६०-७०% पेक्षा कमी गुण होते. हेच प्रमाण २०२४ मध्ये ६०% वर गेले आणि यावर्षी २०२६ मध्ये तब्बल ९०% वर पोहोचले आहे. म्हणजे १०वी-१२वीत साधे पास होणारे विद्यार्थी थेट सीईटीत ९९ आणि १०० पर्सेंटाइल मिळवून टॉपर होत आहेत. हे सर्व विद्यार्थी विशिष्ट सल्लागार संस्थांशी जोडलेले असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष ■ पान ४ वर

# पैठण नगरपरिषदेत राष्ट्रवादीला प्रतिनिधित्व; जितूसिंग परदेसी यांची स्वीकृत नगरसेवकपदी निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण नगरपरिषदेच्या स्वीकृत नगरसेवकपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष जितूसिंग परदेसी यांची निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष विनोद तांबे, तालुकाध्यक्ष विलास भैय्या शेळके आणि सेवादल जिल्हाध्यक्ष अनिल हजारे यांनी परदेसी यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या निवडीमुळे शहरातील पक्ष संघटनेला अधिक बळ मिळणार असून, नगरपरिषदेत नागरिकांच्या प्रश्नांना प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळणार असल्याची भावना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.



# राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते ग्रीन क्रुसेडर्स आणि अचिव्हर्स पुरस्कार' वितरण

## विकासासोबत पर्यावरण संवर्धनाची सांगड घालणे काळाची गरज : राज्यपाल






**पुणे –** विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नसून, दोन्हींची सांगड घालून शाश्वत विकास साधणे ही काळाची गरज आहे. निसर्गाचे संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य असून, येणाऱ्या पिढ्यांसाठी सुरक्षित पर्यावरणाचा वारसा सोपविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

भामला फाउंडेशन आणि पंचशील रिॲलिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाला सुशोभीकरण मोहीम' तसेच 'ग्रीन क्रुसेडर्स आणि अचिव्हर्स पुरस्कार' वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक तथा गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष नादिर गोदरेज, भामला फाउंडेशनचे संस्थापक आसिफ भामला, पंचशील रिॲलिटीचे संस्थापक व अध्यक्ष अतुल चोरडिया, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि पुरस्कारार्थी उपस्थित होते.

राज्यपाल वर्मा म्हणाले, पर्यावरण हा आपल्याला मिळालेला वारसा आहे. वास्तू किंवा ऐतिहासिक वारसा जपतो त्याचप्रमाणे निसर्गाचाही वारसा समृद्ध करून पुढील पिढीकडे सोपविणे हे आपले कर्तव्य आहे.

प्रगती करतांना आपली संस्कृती आणि परंपरा सोबत आवश्यक आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये जंगलांना केवळ झाडे, पाने आणि प्राण्यांचे अधिवास म्हणून पाहिले गेले नाही, तर ज्ञानाचे भांडार म्हणून त्याकडे पाहिले गेले. निसर्गाचा वापर करायचा, मात्र त्याचे शोषण करायचे नाही, ही भारतीय जीवनपद्धतीची शिकवण असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

ईशान्य भारतातील जैवविविधतेचा उल्लेख करताना त्यांनी निसर्गाला पवित्र मानणाऱ्या आदिवासी संस्कृतीचे उदाहरण दिले. मेघालयातील पवित्र उपवने आणि नागालँडमधील पवित्र जंगले ही मानव आणि निसर्गातील सहजीवी नात्याची उदाहरणे आहेत. 'अतिथी देवो भव'प्रमाणेच 'प्रकृती देवो भव' ही भावना अंगीकारण्याची गरज असल्याचे राज्यपाल म्हणाले. आज जगभरात अचानक येणारे महापूर, ढगफुटी, दुष्काळ यांसारख्या घटनांमध्ये वाढ होत आहे. नेपाळसह विविध ठिकाणी घडणाऱ्या नैसर्गिक आपत्ती आपल्याला सावध करतात. निसर्गाचे शोषण केले तर त्याची किंमत मोजावी लागते. निसर्ग जेव्हा उत्तर देतो, तेव्हा त्याच्यासाठी कोणीही लहान-मोठा नसतो. त्यामुळे स्वतः ला सुरक्षित ठेवायचे असेल तर जंगल, जैवविविधता आणि संपूर्ण पर्यावरण सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

नागरिकांना पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्यासाठी प्रेरित करणे आणि त्यासाठी आवश्यक संस्कृती निर्माण करणे गरजेचे आहे. संविधानाने दिलेल्या मूलभूत कर्तव्यांपैकी निसर्गाचे संरक्षण करणे, त्याचा विवेकपूर्ण वापर करणे आणि पुढील पिढ्यांसाठी चांगला वारसा निर्माण करणे हे अत्यंत महत्त्वाचे कर्तव्य आहे, असे राज्यपालांनी सांगितले. समाज आणि शासनाने एकत्रितपणे काम केल्यास पर्यावरण संवर्धनाला व्यापक यश मिळेल. सिंगल यूज प्लास्टिकच्या वापराविरोधातील प्रयत्नांचा संदर्भ देत त्यांनी केवळ आवाहन, दंड किंवा निरीक्षण ■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### मुख्याध्यापिका मीना पवार यांना 'आदर्श शिक्षिका' पुरस्काराने गौरव



अहिल्यानगर - शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणाऱ्या श्रीमती मीना पवार यांना राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षिका' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जन आरोग्यम, जाणीव फाउंडेशन संगमनेर, संचार निगम पेन्शनर्स वेलफेअर असोसिएशन आणि अमृत उद्योग समूह यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजितदादा तांबे यांच्या हस्ते मीना पवार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. खांडगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार सोहळ्यात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव करण्यात आला. श्रीमती मीना पवार यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेले विविध उपक्रम तसेच सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. त्या अहमदनगर एज्युकेशन सोसायटी प्राथमिक शाळा वाबोरी येथे मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याचा सन्मान तर झालाच, शिवाय शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षकवृंद, विद्यार्थी, पालक, शाळा व्यवस्थापन तसेच ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

### 'अहिल्यानगरची अन्नपूर्णा आजी' म्हणून मीरा आव्हाड यांचा गौरव

अहिल्यानगर - शिक्षणासाठी घरापासून दूर येणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अल्पदरात पौष्टिक, चवदार आणि घरगुती भोजन उपलब्ध करून देत त्यांच्या शिक्षणप्रवासाला मायेचा आधार देणाऱ्या मीरा भगवान आव्हाड यांच्या सेवाभावी कार्याचा पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित करण्यात आलेल्या 'तिरंगा राष्ट्रीय धारणालय' कार्यक्रमात त्यांना 'अहिल्यानगरची अन्नपूर्णा आजी' या सन्मानाने गौरविण्यात आले. साडी व फेटा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. मीरा आव्हाड आपल्या कुटुंबीयांसह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी भोजनालय चालवतात. शहरात शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना घरगुती आणि सकस अन्न मिळावे, त्यांना परवडणाऱ्या दरात दोन वेळचे जेवण उपलब्ध व्हावे, या भावनेतून त्या गेल्या काही काळापासून ही सेवा करीत आहेत. दररोज सुमारे पाचशे विद्यार्थ्यांच्या ताटात मायेचा घास वाढण्याचे काम त्या करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी त्यांचे भोजनालय केवळ मेस न राहता घरच्या जेवणाची उब देणारे ठिकाण बनले आहे. मीरा आव्हाड यांच्या दिवसाची सुरुवात पहाटे पाच वाजता होते. विद्यार्थ्यांच्या जेवणाची तयारी, स्वयंपाक, भोजनाची व्यवस्था आणि इतर कामे करीत त्या रात्री साडेअकरा वाजेपर्यंत कार्यरत असतात. एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांसाठी दररोज दोन वेळचे भोजन तयार करण्याचे आव्हान त्या कुटुंबीयांच्या मदतीने समर्थपणे पेलत आहेत. त्यांच्या हातच्या जेवणात घरगुती चव, स्वच्छता आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी यांना विशेष महत्त्व दिले जाते.शिक्षणासाठी शहरात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये अनेक विद्यार्थी ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या सामान्य कुटुंबांतून येतात. घरापासून दूर राहताना त्यांना पौष्टिक आणि परवडणारे भोजन मिळणे ही मोठी गरज असते. ही गरज ओळखून मीरा आव्हाड यांनी विद्यार्थ्यांना अल्पदरात घरगुती भोजन देण्याचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील एक महत्त्वाची चिंता दूर झाली आहे.सत्काराला उत्तर देताना मीरा आव्हाड यांनी आपल्या सेवेमागील भावना व्यक्त केली. ''गरिबीमुळे माझ्या मुलाला उच्च शिक्षण घेताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. शिक्षणासाठी घरापासून दूर राहणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्याला उपासमार किंवा कुपोषण सहन करावे लागू नये, हीच माझी भावना आहे,'' असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना अल्पदरात घरगुती भोजन मिळावे आणि त्यांच्या शिक्षणात अन्नाची कमतरता अडथळा ठरू नये, या उद्देशाने मेस चालवित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मीरा आव्हाड यांच्या अथक परिश्रमांची आणि मायेने बनविलेल्या घरगुती भोजनाची विद्यार्थ्यांकडून विशेष प्रशंसा केली जाते. पहाटेपासून रात्रीपर्यंत सातत्याने काम करून शेकडो विद्यार्थ्यांची भोजनाची व्यवस्था सांभाळणे हे मोठे जबाबदारीचे काम आहे. मात्र, विद्यार्थ्यांना चांगले जेवण मिळते आणि त्यांना घरापासून दूर असताना आपुलकीचा आधार मिळतो, याचे समाधानच आपल्यासाठी महत्त्वाचे असल्याचे मीरा आव्हाड यांचे म्हणणे आहे. यावेळी ॲड. कारभारी गवळी यांनी मीरा आव्हाड यांच्या कार्याचे कौतुक केले. ''विद्यार्थ्यांना केवळ भोजन न देता त्यांच्या शिक्षणप्रवासाला शारीरिक बळ आणि मायेचा आधार देणारे मीरा आव्हाड यांचे कार्य हे लोकभक्ती आणि कर्मभक्तीचे जिवंत उदाहरण आहे,'' असे त्यांनी सांगितले.

# शिर्डीत साई संस्थान सोसायटीच्या वार्षिक सभेत साईज्योत इमारतीच्या मुद्द्यावरून तुफान खडाजंगी

## विरोधकांचा गोंधळ अन् चेअरमन विठ्ठल पवारांचे सडेतोड प्रत्युत्तर; संस्थेच्या प्रगतीचा लेखाजोखा मांडत दिला श्रद्धा-सबुरीचा संदेश!



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शिर्डी –** राज्यात सहकार क्षेत्रात अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत साईज्योत इमारतीचे रखडलेले काम आणि शहरात नवीन जागा खरेदीच्या विषयावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. जुन्या संचालक मंडळातील काही सदस्य व आजी-माजी चेअरमन यांनी या विषयावर आक्षेप घेत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, चेअरमन विठ्ठल पवार यांनी विरोधकांचे सर्व आरोप खोडून काढत संस्थेच्या ऐतिहासिक कामगिरीचा आढावा मांडला आणि विरोधकांना संयम व श्रद्धा-सबुरी राखण्याचा सल्ला दिला.

साई संस्थान सोसायटीच्या वार्षिक सभेच्या सुरुवातीलाच साईज्योत इमारतीचा मुद्दा ऐरणीवर आला. २०१४ पासून रखडलेल्या या इमारतीचे काम अद्याप का पूर्ण झाले नाही आणि चौकशीच्या फेऱ्यात अडकलेल्या या वास्तूऐवजी संस्थेसाठी शहरात नवीन जागा घेण्याचा प्रस्ताव का मांडला जात आहे, असा सवाल माजी संचालकांनी उपस्थित केला. उर्वरित जागेत ५० लाख रुपयांत २००० स्क्वेअर फूट जागेत नवीन कार्यालय ६ महिन्यांत उभे करता येऊ शकते, असा पर्याय विरोधकांनी मांडला. तसेच ५५० सभासदांच्या स्वाक्षऱ्यांचा हवाला देत नवीन जागा खरेदीला विरोध दर्शवला.

यावर सत्ताधारी पक्षाने तात्काळ प्रत्युत्तर दिले. ५५० सह्यांचा दावा करणाऱ्या विरोधकांपैकी प्रत्यक्षात केवळ ७ ते ८ जणच विरोधासाठी विरोध करत असल्याचे चेअरमन विठ्ठल पवार यांनी स्पष्ट केले. तसेच विरोधक सत्तेत असताना त्यांनी स्वतः युनियन बँकेची इमारत ११ कोटींना खरेदी करण्याचा प्रयत्न केला होता, तेव्हा संस्थेचे हित कुठे गेले होते..? असा सवाल उपस्थित करत विरोधकांची दुटप्पी भूमिका उघडी पाडली.

साईज्योत इमारतीच्या बांधकामाची २०१६ ते २०२६ दरम्यान शासकीय पातळीवर चौकशी सुरू असून कायदेशीर बाबी पूर्ण झाल्याशिवाय त्यावर कोणतेही काम करता येत नाही. चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी साई भक्तांसाठी मिनरल वॉटर बॉटल प्रकल्प आणि प्रसाद निर्मितीचा कारखाना सुरू करण्याचा संचालक मंडळाचा मानस असल्याचे चेअरमन पवार यांनी जाहीर केले. तसेच शहरात संस्थेचे हक्काचे कार्यालय असावे यासाठी परिपत्रक काढत सर्वसामान्य सभासदांचे लेखी संमतीपत्र घेऊनच पारदर्शक पद्धतीने निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

चेअरमन विठ्ठल पवार यांनी आपल्या भाषणात संचालक मंडळाच्या कार्यकाळातील उल्लेखनीय कामांचा पाढा वाचला यात जामीनदार मुक्त कर्ज योजनेअंतर्गत सभासदांना दिलासा देण्यासाठी सुरू केलेल्या जामीनदार मुक्त योजनेचा शेकडो कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला तसेच अन्न व औषध प्रशासनाचे () कडक निकष पाळून महिनाभर खराब न होणारा दर्जेदार पेढा भक्तांसाठी उपलब्ध केला.

त्याचप्रमाणे साई भक्तांना अवघ्या १० रुपयांत १ लिटर आणि २० रुपयांत २ लिटर थंड पाण्याची बाटली उपलब्ध करून दिली. तर माजी संचालकांच्या फायद्यासाठी चालणारे पिशव्यांचे गैरव्यवहार बंद करून केंद्र व राज्य शासनाच्या नियमानुसार १२० मायक्रॉनच्या पीओपी बॅगचा वापर सुरू केला. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या प्रेरणेने आणि १९५७ मध्ये संस्था स्थापन करणाऱ्या बळीरामजी कोते पाटील यांच्या विचारांचा वारसा जपत संस्थेचा कारभार सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास असल्याचे सांगत विठ्ठल पवार यांच्या एकहाती नेतृत्वाच्या पॅनेलने मागील निवडणुकीत १७-० अशा ऐतिहासिक फरकाने विरोधकांचे डिपॉझिट जप्त करून सभासदांनी नवीन संचालक मंडळाला विजयी केले होते.यापुढील काळात महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली संस्था सभासदांच्या हिताचे निर्णय घेत राहील. केवळ राजकीय द्वेषापोटी विरोध करणाऱ्यांना कामातूनच चोख उत्तर दिले जाईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या वार्षिक सभेतील संभाव्य तणाव पाहता शिर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सागर काळे, संदीप उदावंत व पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. यावेळी चेअरमन विठ्ठल तुकाराम पवार पा, व्हा. चेअरमन पोपटराव भास्करराव कोते पा. संचालक महादु बापुसाहेब कांदळकर, कृष्णा नाथा आरणे, भाऊसाहेब चांगदेव कोकाटे पा., संभाजी शिवाजी तुरकणे पा., देविदास विश्वनाथ जगताप, विनोद गोवर्धन कोते पा., मिलींद यशवंत दुनबळे, तुळशिराम रावसाहेब पवार पा., रविंद्र बाबु गायकवाड, भाऊसाहेब लक्ष्मण लवांडे पा., इकबाल फकिरमहंमद तांबोळी, सौ सुनंदा किसन जगताप पा., सौ. लता मधुकर बारसे पा., रंभाजी काशिनाथ गागरे, भाऊसाहेब भानुदास लबडे पा., सचिव विलास गोरखनाथ वाणी पा. सह सचिव बाबासाहेब शंकर अनर्थे पा., सहाय्यक सह सचिव संभाजी सोपान कोते पा व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# मोहटेश्वर मंदिराचे लोकार्पण संपन्न

## मोहट्याच्या विकासासाठी देवस्थान समिती प्रयत्नशील राहणार – धर्मदाय उपआयुक्त नवनाथ जगताप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पाथर्डी –** पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थान समितीच्या वतीने मोहटे गावातील जुने मोहटे येथे नव्याने उभारण्यात आलेल्या श्री महादेव मंदिराचा लोकार्पण सोहळा तसेच श्री शिवलिंग व नंदी देवता प्राणप्रतिष्ठा सोहळा रविवारी दि.३० ऑगस्ट २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

यावेळी बोलताना श्री क्षेत्र मोहटादेवी देवस्थान समितीचे अध्यक्ष तथा अहिल्यानगरचे धर्मदाय उपआयुक्त नवनाथ जगताप म्हणाले की, मोहटे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी देवस्थान समितीच्या वतीने आवश्यक ते प्रयत्न करण्यात येतील. गावातील मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, पाण्याची व्यवस्था करणे, जलसंधारणाची कामे हाती घेणे तसेच राज्य शासनाच्या विविध योजना गावात प्रभावीपणे राबविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. श्री महादेव मंदिर लोकार्पण व प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त सकाळी गावातून सुवासिनी पारंपरिक पद्धतीने कलश मिरवणूक काढण्यात आली.

मिरवणुकीत महिलांचा मोठा सहभाग होता. मंदिर उभारणीसाठी जागा दान स्वरुपात दिल्याबद्दल श्रीमती राधाबाई दहिफळे व श्रीमती सविता दहिफळे यांचा श्री मोहटादेवी देवस्थान समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. श्रीक्षेत्र ओंकारेश्वर येथून श्री नर्मदेश्वर शिवलिंग व नंदी मूर्ती मोहटे येथील माजी सैनिक ईश्वर आश्रूबा दहिफळे दिली त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे पौराहित्य वेद्शात्र संपन्न नारायण देवा सुलाखे खोकरमोहकर , सच्चीतानंद देशपांडे, भूषण साकरे, रविदेवा जोशी यांनी भक्तिमय वातावरणात मंत्रोच्चार व धार्मिक विधी संपन्न झाला. श्री शिवलिंग व नंदी देवतेची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यानंतर श्री महादेव मंदिराचा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमास देवस्थान समितीचे विश्वस्त अशोक दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, , शुभम दहिफळे, शशिकांत दहिफळे, राजेंद्र शिंदे, अँड. विक्रम वाडेकर अँड. कल्याण बडे, अँड. प्रसन्न दराडे, बाळासाहेब लाहोटी, सामाजिक कार्यकर्ते अँड मानसिंग पवार, कुंजीर भाऊ , राजकुमार पाटील वास्तुविशारद प्रल्हाद जोशी , ठेकेदार मंगेश कुलकर्णी, बांधकाम सल्लागार मे. रामकृष्ण एन्टरप्राजेसचे संजय क्षीरसागर यांचेसह माजी विश्वस्त तसेच देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, लेखापाल संदीप घुले यांच्यासह मोहटे गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, वि.वि.सेवा.सो. चेअरमन व सदस्य तसेच सर्व ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. धार्मिक सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांसाठी श्री मोहटादेवी देवस्थान समितीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## दुष्काळावर मात करत चिंचाळ्यातील शेतकऱ्याची केळी थेट दुबईच्या बाजारात!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** पैठण तालुक्यातील चिंचाळा येथील शेतकरी माऊली पाटील खैरे यांनी दुष्काळी परिस्थितीवर मात करत घेतलेल्या केळी पिकाला थेट दुबईच्या बाजारपेठेची वाट मिळाली आहे. त्यांच्या शेतातील गुणवत्तापूर्ण केळीची थेट दुबई मार्केटमध्ये विक्री झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

पाण्याची कमतरता आणि प्रतिकूल परिस्थिती असतानाही आधुनिक तंत्रज्ञान, योग्य नियोजन व मेहनतीच्या जोरावर त्यांनी केळीचे दर्जेदार उत्पादन घेतले. स्थानिक बाजारपेठेपुरते मर्यादित न राहता उत्पादनाला थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळाल्याने पैठणच्या शेतकऱ्यांच्या शेतीमालाला परदेशी बाजारपेठेची नवी दारे खुली होत असल्याचे चित्र आहे.

माऊली पाटील खैरे यांच्या या यशाचे परिसरातून कौतुक होत असून, इतर शेतकऱ्यांसाठीही हा प्रयोग प्रेरणादायी ठरत आहे.

## बहुजन विद्यार्थ्यांना शिकवत असताना विद्यार्थी म्हणून नव्हे तर भावी नागरिक म्हणून अध्यापन केले : प्रा. किरण इंगळे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** बहुजन विद्यार्थ्यांना शिकवत असताना विद्यार्थी म्हणून नव्हे तर भावी नागरिक म्हणून अध्यापन केले असल्याचे प्रतिपादन दादासाहेब रुपवते विद्यालय व जुनिअर कॉलेजचे प्रा. किरण इंगळे यांनी केले. त्यांचा सेवापूर्ती चा कार्यक्रम येथील बहुजन शिक्षण संचलित दादासाहेब रुपवते विदयालय व जुनिअर कॉलेज येथे संम्पन्न झाला. यावेळी त्यांचा त्यांच्या सुविद्य पत्नी रेखाताई इंगळे व कुटूंबिया समवेत दादासाहेब रुपवते विदयालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने शाल, फेटा, सन्मान चिन्ह, पुष्पगुच्छ देत सत्कार करण्यात आला.

यावेळी सत्काराला उत्तर देतांना प्रा. इंगळे बोलत होते. सेवापुर्ती समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी. महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण संघटनेचे माजी अध्यक्ष भास्करराव जऱ्हाड हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य प्रमोद सूर्यवंशी, यांनी केले.यावेळी बहुजन शिक्षण संघांचे रजिस्ट्रार प्रा. रवींद्र एडके, माजी रजिस्ट्रार प्रा. व्ही. एम. बैचे, निवृत्त नायब तहसीलदार शशिकांत दळवी, पर्यवेक्षक प्रा. जयंत गायकवाड,प्रा. राहुल खंडीझोड,संपादक महेश भोसले, प्रा.भिमराव पगारे, संजय पाबळकर, नेहा नेहा इंगळे, सदाशिव पवार, आदिनाथ मोरे, दिपक ठाणगे, ज्ञानदेव कोरडे आदींनी आपल्या मनोगतातून आपल्या भावना व्यक्त करत प्रा. इंगळे यांना पुढील निवृत्ती नंतरच्या जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी पुढे बोलतांना प्रा. इंगळे म्हणाले, आजचा क्षण माझ्यासाठी अत्यन्त भावुक आहे. ३१ वर्षांपूर्वी महाविद्यालय पाऊल ठेवले त्यावेळी आम्ही आमच्या गुणवत्तेने महाविद्यालयात रुजू झालो माझा विषय राज्यशास्त्र असल्यामुळे मला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने प्रमुख वक्ता म्हणून बोलण्याची संधी संस्थेमुळे मिळाली. आजही मला माझी जुने विद्यार्थी जे चांगल्या पदावर कार्य करीत आहेत ते भेटून सर आपण दिलेल्या राज्यशास्त्राचे ज्ञान आम्हाला उपयुक्त ठरत असल्याचे वाक्य ऐकल्यामुळे आपण ३१ वर्ष केलेल्या अध्यापन सेवेचे समाधान वाटते. लोकशाही ही जगण्याची पद्धत आहे. हे विद्यार्थ्यांवर बिंबवण्याचे काम मी शिक्षक म्हणून केले. आणि यात मला मनापासून समाधान असल्याची भावना प्राध्यापक किरण इंगळे यांनी यावेळी उपस्थितांसमोर व्यक्त केली.

## पेमराज सारडा महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धेचे उद्घाटन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभागीय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पेमराज सारडा महाविद्यालयाच्या मल्लखांब सेंटरवर २७ ऑगस्ट रोजी आंतरमहाविद्यालयीन मल्लखांब आणि रोप मल्लखांब स्पर्धा आयोजित करण्यात आली.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, ज्येष्ठ संचालक श्री. अजित बोरा, ज्युनिअर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूल चे चेअरमन डॉ. पारस कोठारी,रामकृष्ण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मोहन शेठ मानधना, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित, अहिल्यानगर क्रीडा विभागीय समितीचे सचिव डॉ. सतीश चोरमले, अहिल्यानगर मल्लखांब संघटनेचे अध्यक्ष श्री. नंदेश शिंदे, सचिव श्री. निलेश कुलकर्णी, वरिष्ठ महाविद्यालयाचे



उपप्राचार्य प्रा. मिलिंद देशपांडे तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. गिरीश पाखरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस यांनी पेमराज सारडा महाविद्यालय आणि मल्लखांबचे माजी खेळाडू यांच्यातील जुना आणि आजही कायम असलेला ऋणानुबंध याबद्दल मनोगत व्यक्त केले. ''सलग बारा वर्षांपासून आम्ही ही स्पर्धा आयोजित करत आहोत. क्रीडा विभागाला हिंद सेवा मंडळाचा नेहमीच पाठिंबा असतो,'' असे त्यांनी सांगितले. मल्लखांबच्या विकासासाठी महाविद्यालयाने दिलेले योगदानही त्यांनी अधोरेखित केले.

मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी खेळाडूंना आत्मविश्वास, जिद्द आणि चिकाटी ठेवून स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित यांनी पेमराज सारडा महाविद्यालयाच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यात मल्लखांब खेळाचा झालेला प्रसार याबद्दल खेळाडूंना माहिती दिली.

डॉ. पारस कोठारी आणि मोहन शेठ मानधना यांनी सहभागी खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे यांनी केले.

# युनूस तांबटकर यांचा कलम ४७ अंतर्गत दाखल अर्ज धर्मादाय सहआयुक्तांकडून रद्द

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नागोरी मुस्लीम मिसगर जमाअत ट्रस्ट एफ-१७च्या कार्यकारणीबाबत पुणे येथील मा. धर्मादाय सहआयुक्तांकडे महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० मधील कलम ४७ अन्वये युनूस तांबटकर यांनी दाखल केलेला अर्ज क्र. ६०/२०१६ अखेर रद्द करण्यात आला आहे. दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकून तसेच सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची व पुराव्यांची पडताळणी केल्यानंतर धर्मादाय सहआयुक्तांनी हा अर्ज रद्द केल्याची माहिती ट्रस्टचे जनरल सेक्रेटरी रेहान शफी अहमद काझी यांनी शनिवारी (दि.२९ ऑगस्ट) पत्रकार परिषदेत दिली.

युनुस सुलतान तांबटकर व इतरांनी सन २०१६ मध्ये पुणे येथील धर्मादाय सहआयुक्तांकडे कलम ४७ अन्वये नागोरी मुस्लीम मिसगर जमाअत ट्रस्टवर पाच वर्षांच्या



कालावधीसाठी नेमणूक करण्याबाबत अर्ज दाखल केला होता. या अर्जाला तत्कालीन विश्वस्त तथा ट्रस्टचे माजी जनरल सेक्रेटरी तनवीर मुनीर खान व ॲड. जावेद खुदाबक्ष काझी यांनी कलम ७३-अ अन्वये हरकत घेतली होती. सदर हरकत धर्मादाय आयुक्तांनी मंजूर केली होती.

दरम्यान, युनुस सुलतान तांबटकर व इतरांनी सन २०२१ मध्ये इम्रान शफी अहमद शेख यांच्या माध्यमातून अहमदनगर येथील धर्मादाय उपआयुक्तांच्या कार्यालयात अहमदनगर यांच्या कडे बदल अर्ज क्र. १४५७/२०२१ दाखल करण्यात आला होता असे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. या अर्जासंदर्भातील कागदपत्रे, पुरावे व परिस्थितीची चौकशी करून संबंधित बदल अर्ज फेटाळण्यात आल्याचा दावा ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

सन २०२२ मध्ये नागोरी मुस्लीम मिसगर जमाअत ट्रस्टची निवडणूक झाल्यानंतर त्यासंदर्भातील बदल अर्ज क्र. ७३२/२०२२ अहमदनगर येथील धर्मादाय उपआयुक्तांच्या कार्यालयात दाखल करण्यात आला आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाच कलम ४७ अन्वये दाखल केलेल्या अर्जावर पुणे येथील धर्मादाय सहआयुक्तांसमोर सुनावणी झाली. दि.६ ऑगस्ट २०२६ रोजी दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर उपलब्ध कागदपत्रे व त्यातील नोंदींचे अवलोकन करून धर्मादाय सहआयुक्तांनी अर्ज क्र. ६०/२०१६ रद्द केला. तसेच रेहान शफी काझी यांनी दाखल केलेला बदल अर्ज क्र. ७३२/२०२२ पुढील सहा महिन्यांत निकाली काढण्याचे आदेश दिल्याचे रेहान काझी यांनी स्पष्ट केले.

यावेळी रेहान काझी यांनी युनूस तांबटकर व त्यांच्या नातेवाईकांकडून ट्रस्टच्या कारभारात हस्तक्षेप केल्याचा आरोप केला. ट्रस्टच्या मिळकतीमध्ये अनधिकृत बांधकाम करून गाळे उभारणे, त्यातून मोठ्या प्रमाणात रक्कम जमा करून तिचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करणे, अवैध भाडे वसुली करणे, ट्रस्टच्या भाडेकरूंना अधिकार नसताना नोटिसा पाठवून पैशांची मागणी करणे, तसेच ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध खोटे व बनावट गुन्हे दाखल करणे, असे आरोप त्यांनी केले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अर्हम् पेरेंटिंग : सजग पालकत्वासाठी एक नवा दृष्टिकोन

अहिल्यानगर - आजच्या धकाधकीच्या आणि बदलत्या जीवनशैलीत मुलांचे संगोपन हे पालकांसमोरचे एक महत्त्वाचे आव्हान बनले आहे. मुलांचा अभ्यास, आरोग्य, विविध उपक्रम, शाळेतील सहभाग आणि उज्ज्वल भविष्य यासाठी प्रत्येक पालक प्रयत्नशील असतो. मात्र, केवळ सुविधा आणि गरजा पूर्ण करण्याबरोबरच मुलांच्या भावना, विचार आणि दैनंदिन जीवनातील बदल समजून घेणेही तितकेच आवश्यक असल्याचा संदेश अर्हम् पेरेंटिंगच्या विशेष उपक्रमातून दिला जाणार आहे. आजच्या मुलांमध्ये वाढता स्क्रीन टाइम, छोट्या-छोट्या गोष्टींवर राग येणे, ताण व चिंता, एकाग्रतेची कमतरता, बदलत्या खाण्याच्या सवयी, संवादातील अडचणी, हट्टीपणा तसेच स्वतःच्या समस्या मोकळेपणाने व्यक्त करता न येणे अशा अनेक परिस्थिती पालकांसमोर येत आहेत.या परिस्थितींकडे केवळ समस्या म्हणून न पाहता, मुलांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याची संधी म्हणून पाहणे आवश्यक आहे. याच उद्देशाने पालकांसाठी ''अर्हम् पेरेंटिंग कोर्स'' आयोजित करण्यात आला आहे.या विशेष सेशनमध्ये मुलांचे दैनंदिन जीवन, त्यांचे बदलते विचारविश्व, भावना आणि वर्तन समजून घेताना पालकत्वाकडे नव्या दृष्टिकोनातून कसे पाहावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.हा कोर्स २ सप्टेंबर ते ६ सप्टेंबर दरम्यान दररोज रात्री ८.३० ते १०.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला आहे.ठीकाण आनंदधाम विशेष म्हणजे, या उपक्रमासाठी आई-वडील दोघांची उपस्थिती अनिवार्य ठेवण्यात आली आहे.''कारण मुलांच्या सुंदर भविष्यासाठी आई आणि वडील दोघांचीही साथ तितकीच महत्त्वाची आहे.'' चला, बनूया जबाबदार, सजग आणि समजून घेणारे पालक!अधिक माहितीसाठी संपर्क ९४२०९५०८७३ ९४२०६ ४३८१९.

### घनकचरा विभागातील मनुष्यबळाचे नियोजन संशयाच्या भोवऱ्यात!

अहिल्यानगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाशी संबंधित मनुष्यबळात वारसाहक्क व अनुकंपा तत्त्वावरील नियुयांमुळे वाढ होत असताना, या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर महानगरपालिकेच्या तिजोरीतून मोठ्या प्रमाणात खर्च केला जात आहे. मात्र, दुसरीकडे शहरातील कचरा संकलनाचे काम खासगी ठेकेदारामार्फत करून घेण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च सुरूच आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडे कर्मचारी उपलब्ध असताना कचरा संकलनासाठी खासगी ठेकेदाराची आवश्यकता नेमकी का आहे, असा गंभीर प्रश्न कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगरचे जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडानशिवे यांनी उपस्थित केला आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी नियुक्त अथवा उपलब्ध झालेल्या वारसाहक्क व अनुकंपा तत्त्वावरील काही कर्मचाऱ्यांना प्रत्यक्षात बांधकाम विभाग तसेच पाणीपुरवठा विभागात कामासाठी पाठविले जात असल्याची माहिती समोर येत असल्याचा दावा उडानशिवे यांनी केला आहे. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा नेमका वापर कुठे आणि कशासाठी केला जात आहे, याबाबत महानगरपालिकेने पारदर्शकपणे माहिती जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. महानगरपालिकेच्या सेवेत कर्मचारी संख्या वाढत असताना त्यांच्या वेतनासाठी सार्वजनिक निधीतून खर्च होत आहे. मात्र, त्याचवेळी शहरातील कचरा संकलनासाठी खासगी ठेकेदाराला स्वतंत्रपणे कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात असल्यास ही दुहेरी आर्थिक व्यवस्था का निर्माण झाली आहे, याचा खुलासा प्रशासनाने करणे गरजेचे आहे. जर घनकचरा व्यवस्थापन विभागाशी संबंधित कर्मचारी इतर विभागांमध्ये कार्यरत केले जात असतील, तर त्यानंतर घनकचरा व्यवस्थापन विभागात मनुष्यबळाची कमतरता निर्माण होत असल्याचे कारण पुढे करून खासगी ठेकेदारामार्फत कचरा संकलन सुरू ठेवले जात आहे का, असा प्रश्नही उडानशिवे यांनी उपस्थित केला आहे.

# डेंगू हा जीवघेणा आजार; जनजागृती आणि उपाययोजनांची खरी गरज - आयुक्त यशवंत डांगे

**। डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानाच्या पाचव्या आठवड्यात न्यू इंग्लिश स्कूलमध्ये जनजागृती**
**। विद्यार्थ्यांकडून डेंगू प्रतिबंधासाठी घ्यावयाची काळजी व उपाययोजनांबाबत जनजागृती**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पावसाळा सुरू झाला की साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून गेल्या तीन वर्षांपासून 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' अभियान राबविण्यात येत असून, या अभियानाच्या माध्यमातून डेंगू आजारावर नियंत्रण मिळवण्यात महापालिकेला यश आले आहे.

डेंगूमुक्त अहिल्यानगर साप्ताहिक उपक्रमाच्या पाचव्या आठवड्यानिमित्त अ.नगर एज्युकेशन सोसायटीच्या रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूल येथे डेंगू आजाराबाबत जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून डेंगू आजारापासून बचाव करण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच आवश्यक उपाययोजनांबाबत जनजागृती करण्यात आली.

अभियानाच्या माध्यमातून आतापर्यंत साडेपाच हजार घरांना भेटी देण्यात आल्या आहेत. शहरातील विविध भागांमध्ये औषध व धूर फवारणी करण्यात येत असून, घरांमधील पाणीसाठ्यांची तपासणी करून त्यामध्ये आवश्यकतेनुसार अळीनाशक औषध टाकण्याचे काम केले जात आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या माध्यमातून डेंगू आजाराबाबत नागरिकांमध्ये घ्यावयाची काळजी आणि उपाययोजनांबाबत जनजागृती केली जात आहे.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, डेंगू हा जीवघेणा आजार असून, महापालिकेच्या माध्यमातून नगरकरांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे काम केले जात आहे. डेंगू आजार होऊच नये, यासाठी समाजामध्ये जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची खरी गरज आहे.

महापालिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसह आशा सेविका व आरोग्य सेविकांच्या माध्यमातून नागरिकांची घरोघरी जाऊन तपासणी केली जात आहे. त्याचबरोबर महापालिकेच्या आरोग्य केंद्रांमार्फत मोफत औषधोपचार व रक्त तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विद्यार्थिनींनीदेखील आपल्या घरी तसेच परिसरात स्वच्छता ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा. घराच्या परिसरातील पाणीसाठे नष्ट करून 'कोरडा दिवस' पाळावा, असे आवाहनही आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

माजी महापौर सुरेखाताई कदम म्हणाल्या की, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने सुरू करण्यात आलेले डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियान कौतुकास्पद आहे. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे.

विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य आहेत. त्यांच्या माध्यमातून डेंगू आजाराबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे. हे अभियान केवळ कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता नागरिकांमध्ये पोहोचून त्याचे लोकचळवळीत रूपांतर झाले पाहिजे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून परिसरात स्वच्छतेची मोहीम हाती घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

# कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये अग्निशमन आपत्ती प्रात्यक्षिक सरावाचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर येथे समुदाय आरोग्य परिचर्या विभागाच्या वतीने बी.एस्सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांसाठी अग्निशमन आपत्ती प्रात्यक्षिक सराव आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, तसेच आपत्कालीन परिस्थिती आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या प्रात्यक्षिक सरावामुळे विद्यार्थ्यांना आगीसारख्या आपत्कालीन परिस्थितीत तत्परतेने, प्रभावीपणे आणि सुरक्षितपणे प्रतिसाद देण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांची आपत्कालीन परिस्थितीतील तयारी, आत्मविश्वास आणि व्यावसायिक क्षमता वाढविण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग म्हणून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

आपत्ती किंवा आपत्कालीन परिस्थिती कोणत्याही वेळी उद्भवू शकते. अशा वेळी रुग्णांची सुरक्षितता सुनिश्चित करणे, तातडीने प्राथमिक उपचार देणे, सुरक्षित स्थलांतर करणे, आपत्कालीन पथकांशी समन्वय साधणे आणि आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे, यामध्ये परिचारिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता प्रत्यक्ष कृतीवर आधारित प्रशिक्षण देण्यात आले.

प्रात्यक्षिक सरावादरम्यान विद्यार्थ्यांना अग्निसुरक्षेची मूलभूत तत्त्वे, आपत्कालीन प्रतिसाद, सुरक्षित स्थलांतर प्रक्रिया आणि आपत्ती व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर तातडीने अलार्म देणे, संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देणे, नागरिक व रुग्णांचे सुरक्षित स्थलांतर करणे, घाबरून न जाता शांतपणे परिस्थिती हाताळणे आणि बाधित व्यक्तींना तातडीने प्राथमिक उपचार देणे, याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण देण्यात आले.

या मॉक ड्रिलमध्ये बाधित व्यक्तींना रुग्णवाहिकेद्वारे सुरक्षितपणे रुग्णालयात हलविणे आणि रुग्णालयात आवश्यक आपत्कालीन उपचार उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेचाही समावेश करण्यात आला. सुरुवातीच्या आपत्कालीन प्रतिसादापासून सुरक्षित स्थलांतर, रुग्णवाहिकेद्वारे वाहतूक आणि आपत्कालीन वैद्यकीय उपचारापर्यंतच्या विविध टप्प्यांचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर उपचार तसेच विविध विभागांमधील प्रभावी समन्वयाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजले.

विद्यार्थ्यांनी या प्रात्यक्षिक सरावात उत्स्फूर्त सहभाग घेत आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित विविध कौशल्यांचे प्रदर्शन केले. या उपक्रमातून संघभावना, प्रभावी संवाद, नेतृत्वगुण, तत्पर निर्णयक्षमता तसेच आरोग्यसेवा कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी आणि सहाय्यक पथकांमधील समन्वयाचे महत्त्व अधोरेखित झाले. या प्रात्यक्षिकामुळे विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत स्वतःची तसेच रुग्णांची सुरक्षितता कशी राखावी, संभाव्य धोके कसे ओळखावेत आणि परिस्थितीला नियोजनबद्ध पद्धतीने कसा प्रतिसाद द्यावा, याबाबत आत्मविश्वास मिळाला. सैद्धांतिक ज्ञान आणि प्रत्यक्ष कृती यांच्यातील दुवा निर्माण करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

# आखातवाडा–वाघाडी सिमेंट रस्त्याचा मार्ग मोकळा

**आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या हस्ते भूमिपूजन; चार किलोमीटरच्या रस्त्यामुळे शेतकरी, ग्रामस्थांना दिलासा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण तालुक्यातील आखातवाडा ते वाघाडी या चार किलोमीटर अंतराच्या बहुप्रतीक्षित सिमेंट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या हस्ते रविवारी उत्साहात करण्यात आला. गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याच्या दुरुस्ती व सिमेंट रस्त्याच्या निर्मितीची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत होती. अखेर या मागणीला यश आले असून, रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याने आखातवाडा व वाघाडी परिसरातील नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

मुख्यमंत्री सडक योजनेअंतर्गत आखातवाडा ते वाघाडी हा चार किलोमीटरचा सिमेंट रस्ता मंजूर करण्यात आला आहे. खासदार संदिपान भुमरे यांच्या प्रयत्नातून या रस्त्याला मंजुरी मिळाली असून, आमदार विलास भुमरे यांच्या हस्ते प्रत्यक्ष कामाचा शुभारंभ करण्यात आला. या रस्त्यामुळे परिसरातील गावांना दळणवळणाची सुविधा अधिक सक्षम होणार आहे.

**शेतमाल वाहतुकीची होणार मोठी सोय**

आखातवाडा ते वाघाडी हा रस्ता परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. अनेक वर्षांपासून रस्त्याची अवस्था खराब असल्याने ग्रामस्थांना तसेच शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात या मार्गावरून ये–जा करणे त्रासदायक ठरत होते. शेतमाल बाजारपेठेत नेण्यासाठीही शेतकऱ्यांना अडचणी येत होत्या. नवीन सिमेंट रस्ता पूर्ण झाल्यानंतर शेतमालाची वाहतूक सुलभ होण्याबरोबरच नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाचा वेळ वाचणार आहे. तसेच परिसरातील गावांना मुख्य रस्त्याशी जोडणी अधिक चांगली होऊन विकासाला चालना मिळणार असल्याचे आमदार विलास भुमरे यांनी यावेळी सांगितले.

**वर्षानुवर्षांची मागणी अखेर पूर्ण**

आखातवाडा ते वाघाडी रस्ता व्हावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. या मागणीची दखल घेत खासदार संदिपान भुमरे यांनी शासन स्तरावर पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नातून रस्त्याला मंजुरी मिळाल्यानंतर आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी आमदार व खासदार भुमरे यांचे आभार व्यक्त केले. यावेळी आमदार विलास भुमरे यांनी परिसरातील विकासकामांना प्राधान्य देण्यात येत असून, नागरिकांच्या मूलभूत सुविधा मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. रस्ते, पाणी, वीज आणि दळणवळणाच्या सुविधा सक्षम झाल्यास ग्रामीण भागाच्या विकासाला मोठी गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

ग्रामस्थांची मोठी उपस्थिती भूमिपूजन कार्यक्रमास सरपंच मोहन म्हस्के, कार्यकारी विश्वनाथ दादा बारे, भूषण कावसानकर , संचालक आप्पासाहेब निर्मळ, नामदेव खराद, अनिकेत धारकर, नगरसेवक महेश मुंडडा, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र वाघमोडे, पोपट औटे, उदयसिंग काळे, दांडे कन्स्ट्रक्शनचे संदेश दौंडे, सरपंच मोहन म्हस्के, पोळके महाराज, सरपंच सचिन दिवेकर, यांच्यासह आखातवाडा, वाघाडी येथील ग्रामस्थ, नागरिक, शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर आखातवाडा–वाघाडी परिसरातील दळणवळण अधिक गतिमान होऊन शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि ग्रामस्थांना मोठा फायदा होणार आहे.

# २९ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर स्टेनोग्राफर पीरजादे नजीरहुसेन सेवानिवृत्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे स्टेनोग्राफर ग्रेड–१ म्हणून प्रदीर्घकाळ कार्यरत राहिलेले श्री. पीरजादे नजीरहुसेन हे सुमारे २९ वर्षांच्या प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ व समर्पित सेवेनंतर दि. ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त अहिल्यानगर स्टेनोग्राफर्स असोसिएशनच्या वतीने सावेडी येथील हॉटेल सेज अँड साल्ट येथे सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी असोसिएशनच्या वतीने त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करून त्यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचा गौरव करण्यात आला.

श्री. पीरजादे यांनी न्यायालयीन सेवेत प्रवेश करण्यापूर्वी दोन नामांकित कंपन्यांमध्ये सुमारे सहा वर्षे स्टेनोग्राफर म्हणून सेवा बजावली. त्यानंतर दि. ९ जून १९९७ रोजी संगमनेर येथे कनिष्ठ लिपिक म्हणून शासकीय सेवेत प्रवेश केला. कार्यकुशलता, मेहनत आणि अनुभवाच्या जोरावर त्यांनी स्टेनोग्राफर लोअर ग्रेड, हायर ग्रेड अशी पदोन्नती मिळवत स्टेनोग्राफर ग्रेड–१ अर्थात राजपत्रित अधिकारी, वर्ग–२ या पदापर्यंत यशस्वी मजल मारली.

न्यायव्यवस्थेतील प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी अचूकता, वेळेचे भान, जबाबदारीची जाणीव आणि कर्तव्यनिष्ठा यांना नेहमीच प्राधान्य दिले. न्यायालयीन कामकाजातील त्यांची कार्यतत्परता व सेवाभाव सहकाऱ्यांसाठी तसेच नव्याने सेवेत दाखल होणाऱ्या स्टेनोग्राफरसाठी प्रेरणादायी ठरला. अहिल्यानगर स्टेनोग्राफर्स असोसिएशनच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीपणे सांभाळत संघटनेच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

यावेळी बोलताना मा. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीशांचे पी.ए. श्री. गणेश सब्बन म्हणाले की, न्यायालयीन सेवेमध्ये काम करताना केवळ आपल्या पदाची जबाबदारी पार पाडणे पुरेसे नसते, तर कामामध्ये अचूकता, वेळेचे नियोजन, गोपनीयता आणि कर्तव्याप्रती प्रामाणिकपणा या गुणांची आवश्यकता असते.

# माजी सैनिकांना राजकीय आरक्षण द्या; स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वीकृत सदस्यपदाची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देशाच्या संरक्षणासाठी आयुष्याचा अमूल्य काळ समर्पित करणाऱ्या व समाजात राष्ट्र निष्ठेने काम करणाऱ्या माजी सैनिकांना राजकीय क्षेत्रातही प्रतिनिधित्वाची संधी मिळावी, यासाठी जय हिंद फाउंडेशन अहिल्यानगरच्या वतीने आमदार सत्यजित तांबे यांना राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले. माजी सैनिकांच्या शिष्टमंडळाने निवेदन देऊन माजी सैनिकांना राजकीय आरक्षण तसेच विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वीकृत सदस्य म्हणून प्रतिनिधित्व देण्याची मागणी केली.

माजी सैनिकांच्या या मागणीचा राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन आमदार सत्यजित तांबे यांनी शिष्टमंडळाला दिले. माजी सैनिकांच्या प्रश्नांबाबत शासन स्तरावर सकारात्मक भूमिका घेऊन मुख्यमंत्र्यांकडे यासंदर्भात पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे, जगन्नाथ खामकर, ताराचंद घागरे, प्रकाश कोटकर, महादेव शिरसाठ, संजय पाटेकर, संदीप गुंजाळ, भिकाजी भागवत आदी उपस्थित होते.

जय हिंद फाउंडेशन तसेच महाराष्ट्र राज्यातील विविध सैनिक संघटनांच्या माध्यमातून माजी सैनिकांना राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी सातत्याने मागणी केली जात आहे. देशसेवेतून निवृत्त झाल्यानंतरही अनेक माजी सैनिक सामाजिक कार्य, जनजागृती, नागरिकांच्या समस्या सोडविणे आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रियपणे योगदान देत आहेत.

# 'एसा भवन' पूर्ण करण्यासह तांत्रिक, शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांना प्राधान्य - अध्यक्ष प्रदिप तांदळे

**'आत्मनिर्भर भारत–विश्वगुरू भारत' विषयावर राजाभाऊ मुळे यांचे मार्गदर्शन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा) आणि पोलाद स्टील, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने 'एसा'च्या नूतन संचालक मंडळाचा पदग्रहण सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास पोलाद स्टील, जालनाचे असिस्टंट व्हाईस प्रेसिडेंट आशिष भाबडा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राजाभाऊ उर्फ रवींद्र मुळे यांचे 'आत्मनिर्भर भारतविश्वगुरू भारत' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

अतिथी रवींद्र मुळे आणि आशिष भाबडा यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांना प्रतीकात्मक नेमप्लेट लावून पदभार सोपविण्यात आला. यामध्ये नूतन अध्यक्ष प्रदिप तांदळे, उपाध्यक्ष सुनील औटी, सचिव भूषण पांडव, खजिनदार संतोष खांडेकर, सहसचिव अनमोल जैन यांच्यासह संचालक अन्वर शेख, सुनील जाधव, सचिन डागा, संकेत पादिर, अमोल येनगंदुल, आदिनाथ आंबेकर, सागर ढगे, गौरव मांडगे, अमेय कुलकर्णी आणि विजय उजनीमठ यांचा समावेश आहे.

कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या मागील ४० वर्षांच्या वाटचालीचा आढावा चलचित्र व ध्वनीमुद्रणाच्या माध्यमातून सादर करण्यात आला. संस्थेच्या उभारणीपासून आजपर्यंत




विविध माजी अध्यक्ष व ज्येष्ठ सभासदांनी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांचे आभार मानण्यात आले.

पोलाद स्टीलचे आशिष भाबडा यांनी नूतन संचालक मंडळाचे अभिनंदन करून आगामी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच पोलाद स्टीलच्या वतीने 'एसा'च्या विविध उपक्रमांना आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

नूतन अध्यक्ष प्रदिप तांदळे यांनी आपल्या मनोगतात आगामी वर्षातील संस्थेच्या विविध संकल्पांची माहिती दिली. 'एसा भवन'चे काम पूर्ण करणे तसेच शासकीय विभागांमध्ये काम करताना सभासदांना येणाऱ्या विविध अडचणी सोडविण्यास प्राधान्य दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.याशिवाय पोलाद स्टीलच्या सहकार्याने शाळांमध्ये तारांगण उपक्रम राबविणे, तांत्रिक सेमिनार, प्लांट व शॉप व्हिजिट्स, बेस्ट स्ट्रक्चर व्हिजिट व प्रेझेंटेशन, लेखमाला, मुलाखत मालिका, कौटुंबिक उपक्रम तसेच क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य अतिथी राजाभाऊ मुळे यांनी 'आत्मनिर्भर भारतविश्वगुरू भारत' या विषयावर मार्गदर्शन केले. हडप्पा आणि मोहेंजोदडो येथील टाऊन प्लॅनिंगचे अवशेष हे भारताच्या प्राचीन समृद्ध संस्कृतीची आणि आत्मनिर्भरतेची साक्ष देतात, असे त्यांनी सांगितले.

नवीन पिढीला व्यावसायिक शिक्षण देऊन स्थापत्य कलेकडे त्यांचा कल वाढविणे गरजेचे आहे. मातृभाषेतून अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षण मिळणे, क्षेपणास्त्रांची निर्यात आणि सेमीकंडक्टर प्लांटची उभारणी ही भारताच्या प्रगतीची लक्षणे असल्याचे त्यांनी नमूद केले.

# हजारो मावळ्यांचे राजगडावर श्रमदान

**दुर्गसंवर्धनासाठी 'आपला मावळा'ची मोहीम | खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली १७ वी दुर्गसंवर्धन मोहीम | पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी पाठपुराव्याची ग्वाही**




**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पुणे–** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात आणि स्वराज्याच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या किल्ले राजगडावर खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली 'आपला मावळा' संघटनेच्या माध्यमातून रविवारी भव्य दुर्गसंवर्धन व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. 'आपला मावळा' संघटनेची ही १७ वी दुर्गसंवर्धन मोहीम असून, या उपक्रमात हजारो स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत राजगडाच्या संवर्धनासाठी श्रमदान केले.

भल्या पहाटेच खासदार नीलेश लंके यांच्यासह 'आपला मावळा'चे शेकडो स्वयंसेवक राजगडाच्या पायथ्याशी दाखल झाले. इतिहासाचा अमूल्य वारसा जपण्याचा संकल्प करत स्वयंसेवकांनी गडावर विविध ठिकाणी स्वच्छता व संवर्धनाची कामे हाती घेतली. मोहिमेदरम्यान गडावरील कचरा संकलन, परिसराची स्वच्छता, आवश्यक ठिकाणी डागडुजी, दगड-दुरुस्ती तसेच नामफलक लावण्यासह दुर्गसंवर्धनाचे विविध उपक्रम राबविण्यात आले. हजारो हातांनी केलेल्या श्रमदानामुळे गडाचा परिसर स्वच्छ करण्यास मोठी मदत झाली.

यावेळी खासदार नीलेश लंके यांनी राजगडाच्या ऐतिहासिक महत्त्वावर प्रकाश टाकला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासात राजगडाला अत्यंत विशेष स्थान असून, तब्बल २६ वर्षे हा किल्ला मराठा साम्राज्याची राजधानी होता. महाराजांच्या कारकिर्दीतील अनेक महत्त्वपूर्ण घडामोडींचा राजगड साक्षीदार राहिला आहे. त्यामुळे राजगड हा केवळ एक ऐतिहासिक किल्ला नसून स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाचा अत्यंत महत्त्वाचा ठेवा असल्याचे लंके यांनी सांगितले. मात्र, एवढे मोठे ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्व असलेल्या राजगडावर येणाऱ्या पर्यटक व शिवप्रेमींसाठी आवश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. गडावर जाण्यासाठी पुरेसा व सुस्थितीतील रस्ता उपलब्ध नसल्याने पर्यटकांना अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषतः महिलांसाठी आवश्यक शौचालयांची सुविधा नसल्याचे तसेच इतर मूलभूत सुविधाही अपुऱ्या असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

गड-किल्ल्यांचे जतन आणि संवर्धन करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असली, तरी या ऐतिहासिक ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे लंके यांनी स्पष्ट केले. राजगडाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

'आपला मावळा' संघटनेच्या माध्यमातून यापूर्वीही महाराष्ट्रातील विविध गड-किल्ल्यांवर दुर्गसंवर्धन, स्वच्छता आणि ऐतिहासिक वारसा जतनाच्या मोहिमा राबविण्यात आल्या आहेत. राजगडावरील १७ व्या मोहिमेत तब्बल हजार स्वयंसेवकांनी सहभाग घेत स्वराज्याच्या इतिहासाचा हा अनमोल वारसा जपण्यासाठी श्रमदान केले. या मोहिमेतून तरुणांमध्ये गड-किल्ल्यांविषयी जाणीव, इतिहासाविषयी अभिमान आणि वारसा संवर्धनाची भावना अधिक दृढ होईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# नेवाशात पोलिसांच्या समयसूचकतेमुळे अनर्थ टळला

**जमावाच्या दगडफेकीत पोलिस कर्मचार्याच्या पायावरून गेले वाहन, तरीही दराडेंच्या टीमने परिस्थिती हाताळली!**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**नेवासा–** नेवासा शहरातील श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्याच्या वादातून गुरुवारी दुपारी अचानक तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. फळ विक्रेते आणि भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश शेटे यांच्यात झालेल्या तीव्र वादानंतर चिडलेल्या जमावाने शेटे यांच्या वाहनाची तोडफोड सुरू केली. शहरात गंभीर तणाव निर्माण होत असतानाच, नेवासा पोलिसांनी दाखवलेल्या प्रसंगावधान आणि तत्परतेमुळे एक मोठा गंभीर अनर्थ टळला आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी क्षणाचाही विलंब न लावता अवघ्या दोन पोलिस कर्मचार्यांच्या बळावर घटनास्थळी धाव घेतली. संतप्त जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी कडक इशारा देत बळाचा वापर केला आणि ऋषिकेश शेटे यांच्या वाहनाला अत्यंत शिताफीने सुरक्षीत बाहेर काढले.

**जीव धोक्यात घालून पार पाडले कर्तव्य**

जमावात अडकलेले वाहन बाहेर काढण्याच्या या कसरतीत एका पोलिस कर्मचाऱ्याच्या पायावरून गाडी गेल्याने त्यांच्या पायाच्या बोटाला गंभीर दुखापत झाली आहे. याच दरम्यान एका होमगार्डचा जवानही जखमी झाला. मात्र, स्वतःच्या दुखापतीची पर्वा न करता पोलिसांनी धैर्याने परिस्थितीवर पूर्ण नियंत्रण मिळवले.

**व्यापाऱ्यांकडून पोलिसांचे आभार**

पूर्वी अशा तणावाच्या प्रसंगी खबरदारी म्हणून संपूर्ण बाजारपेठ बंद ठेवावी लागत असे, ज्यामुळे व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असे. परंतु, पोलिस निरीक्षक दराडे आणि त्यांच्या टीमने परिस्थिती इतक्या कौशल्याने हाताळली की एकही दुकान बंद पडले नाही आणि व्यवहार सुरळीत सुरू राहिले. त्यामुळे स्थानिक व्यापारी वर्गातून पोलिसांचे मोठे आभार मानले जात आहेत.

''कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई!''

''सदरील घटना आम्ही अतिशय गंभीरतेने घेतली असून गुन्हे दाखल करून संशयित आरोपींना अटक केली आहे. कायदा हातात घेणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिले आहेत.''

प्रताप दराडे, पोलिस निरीक्षक, नेवासा

# भाई सथ्था नाईट हायस्कूलने 'शिक्षणदूत' अभियानातून १६८ विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणले!

**सर्वाधिक विद्यार्थी प्रवेशित करणाऱ्यांचा गौरव; मासुम संस्थेच्या सर्व्हेनुसार राज्यातील सर्वाधिक विद्यार्थीसंख्या असलेली रात्र शाळा**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** विविध कारणांमुळे अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व जुनिअर कॉलेजच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'शिक्षणदूत' अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या अभियानांतर्गत शाळाबाह्य तसेच अर्धवट शिक्षण सोडलेल्या तब्बल १६८ विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी ४९, तर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ११९ विद्यार्थ्यांना प्रवेशित केले. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत सर्वाधिक विद्यार्थी प्रवेशित करणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध कारणांमुळे अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहिले होते. अशा विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना पुन्हा शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी शिक्षण प्रसार व जनजागृती अभियानाचा एक भाग म्हणून 'शिक्षणदूत' उपक्रम राबविण्यात आला. या शोध मोहिमेत आजी-माजी विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत त्यांना रात्रशाळेत प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. दरम्यान, मुंबई येथील मासुम संस्थेने केलेल्या सर्व्हेनुसार भाई सथ्था नाईट हायस्कूल ही सर्वाधिक विद्यार्थीसंख्या असलेली राज्यातील क्रमांक एकची शाळा ठरली असल्याचे यावेळी सांगण्यात आले. रात्रशाळेत शिक्षण घेण्यासाठी विविध भागांतून विद्यार्थी येत असून, काम, व्यवसाय तसेच अन्य कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही शाळा शिक्षणाची महत्त्वपूर्ण संधी ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर हिंद सेवा मंडळाचे नूतन अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस यांच्या अध्यक्षतेखाली विशेष गौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे उपस्थित होते. यावेळी भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, संस्थेचे उपाध्यक्ष व शालेय समिती सदस्य विलास बडवे, संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, प्राचार्य सुनील सुसरे आदींसह शालेय शिक्षक, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिडकीन टोलमुक्त करा; गावाबाहेरून बायपास काढा!

**व्यापारी, नागरिकांची दुर्गामाता मंदिरात बैठक; ३ सप्टेंबरला पुढील आंदोलनाची दिशा ठरणार**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील बिडकीन गावातील टोल नाका हटवून गावाबाहेरून बायपास मार्ग काढावा, तसेच बिडकीन गावाला प्राधिकरणातून वगळावे, अशी मागणी गावातील व्यापारी व नागरिकांनी केली आहे. यासंदर्भात रविवारी (३० ऑगस्ट) दुर्गामाता मंदिर येथे बैठक घेण्यात आली.

बिडकीन गावातून होणारी वाहतूक आणि टोल नाक्यामुळे नागरिक व व्यापाऱ्यांना होणाऱ्या त्रासाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. गावाच्या विकासाला अडथळा ठरणारा टोल नाका हटवून वाहतूक गावाबाहेरून वळविण्यासाठी बायपास मार्ग काढावा, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली.

या मागण्यांसाठी पुढील भूमिका ठरविण्याकरिता ३ सप्टेंबर रोजी पुन्हा बैठक घेण्यात येणार असून, त्यात आंदोलनाची पुढील रूपरेषा निश्चित केली जाणार आहे. प्रशासनाने बिडकीनकरांच्या मागण्यांची तातडीने दखल घेऊन टोल नाका हटवावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



(पान १ वरून)

## एमएचटी- सीईटीमध्ये महाघोटाळा?

राजेश परकाळे म्हणाले हा फक्त डेटा लीकचा विषय नाही. विद्यार्थ्यांचे नाव, गाव, मोबाईल नंबर, ईमेल, जात-प्रवर्ग असलेली एक्सेल फाईल गोकुळ एज्यू, एलिव्हेट, प्रेरणा, विस्तार सारख्या संस्थांकडे कशी गेली? या संस्थांकडून विद्यार्थ्यांना , , मध्ये पैशावर थेट प्रवेश देतो म्हणून फोन येत आहेत. आमचे म्हणणे आहे की, आज प्रवेशाच्या नावाखाली फसवणूक होत आहे, उद्या याच डेटाचा वापर करून ऑनलाईन आर्थिक फसवणूक, इंस्टाग्रामवर मुलींना बदनाम करणे असे प्रकार घडू शकतात. यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत यांनी माहिती दिली की या घोटाळ्यामागे मोठी साखळी असल्याचा संशय असून

१. सीईटी सेलमधील डेटा हाताळणारे अधिकारी २. परीक्षा घेणारी तांत्रिक कंपनी ३. डेटा विकत घेणाऱ्या सल्लागार संस्था ४. ठराविक परीक्षा केंद्रांचे मालक यासर्वांनी मिळून हा गैरप्रकार केला असून याबाबत कारवाई झाली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी पुढील मागण्या करण्यात आल्या

१. तात्काळ  दाखल करून सीईटी सेलचे सर्व्हर लॉग, डेटा एक्सपोर्ट लॉग जप्त करावेत.

२. संशयित परीक्षा केंद्रांचे सीसीटीव्ही फुटेज आणि कॉम्प्युटर लॉग ताब्यात घ्यावेत.

३. १०० पर्सेंटाइल मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या रिस्पॉन्स शीटची फॉरेन्सिक तपासणी करावी.

४. सल्लागार संस्थांचे मोबाईल, लॅपटॉप आणि बँक,  व्यवहारांची चौकशी करावी.

५. हे प्रकरण आंतरजिल्हा असल्याने ,  किंवा सायबर विभागाकडे चौकशी द्यावी.

दोन वर्षे रात्रंदिवस अभ्यास करणाऱ्या गरीब आणि हुशार विद्यार्थ्यांच्या तोंडचा घास हिरावून घेण्याचा हा प्रकार असून, शासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जाईल, असे प्रतिपादन प्रा अजित खरसडे व प्रा विवेक डोके यांनी केले

याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, जिल्हा संपर्कप्रमुख शाम जरे, प्रा नारायण शिनगारे, प्रा अजित खरसडे, प्रा विवेक डोके, प्रा सच्चिदानंद घोणसे, प्रा सुषमा पोळ, प्रा सुप्रिया गांधी, प्रा बाळासाहेब कीर्तने, सुदाम कोरडे, सचिन काकडे, महेश दानवे, प्रशांत कांबळे, दादा ठोंबरे, भीमजी कोकाटे, राजेंद्र राऊत, सद्दाम सय्यद, बापू जगताप, दिलीप लबडे, दिलीप वाळुंज आदींसह विद्यार्थी गायत्री शिरसाठ, श्रेयसी कदम, शर्वरी राऊत, प्रणव सावंत, जान्हवी भागवत, प्रियांका वरडुले, प्रणव कोटलवाड , सार्थक शिनगारे, उत्कर्ष पोटे, सार्थक अंदुरे, ओम पाटील, राज कदम आदींसह शेकडो विद्यार्थी घोषणा देत मोर्चाने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात हजर होते. मध्ये महा-घोटाळा? हजारो विद्यार्थ्यांचा खाजगी डेटा विकला, १०वी-१२वीत नापास पोरं थेट १०० पर्सेंटाइलवर; अहिल्यानगरातून संभाजी ब्रिगेडची गुन्हा दाखल करण्याची मागणी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)  महाराष्ट्राच्या लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारा सर्वात मोठा शिक्षण घोटाळा समोर आला आहे. एमएचटी-सीईटी पीसीएम परीक्षेसाठी अर्ज केलेल्या हजारो विद्यार्थ्यांचा खाजगी डेटा चोरून खासगी सल्लागार संस्थांना विकल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. याच डेटाचा वापर करून पैसे घेऊन गुणताक्रम वाढवून दिला जात असल्याचा गंभीर आरोप संभाजी ब्रिगेड व प्राध्यापक नारायण शिनगारे, अजित खरसडे यांनी केला असून, पोलीस अधीक्षक आणि मुख्यमंत्र्यांकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

प्रा नारायण शिनगारे यांनी दिलेल्या माहितीनुसार हा प्रकार अत्यंत संघटित आहे. २०२२ मध्ये पहिल्या १०० मधील फक्त २% विद्यार्थी असे होते ज्यांना १०वी-१२वीला ६०-७०% पेक्षा कमी गुण होते. हेच प्रमाण २०२४ मध्ये ६०% वर गेले आणि यावर्षी २०२६ मध्ये तब्बल ९०% वर पोहोचले आहे. म्हणजे १०वी-१२वीत साधे पास होणारे विद्यार्थी थेट सीईटीत ९९ आणि १०० पर्सेंटाइल मिळवून टॉपर होत आहेत. हे सर्व विद्यार्थी विशिष्ट सल्लागार संस्थांशी जोडलेले असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे म्हणाले हा फक्त डेटा लीकचा विषय नाही. विद्यार्थ्यांचे नाव, गाव, मोबाईल नंबर, ईमेल, जात-प्रवर्ग असलेली एक्सेल फाईल गोकुळ एज्यू, एलिव्हेट, प्रेरणा, विस्तार सारख्या संस्थांकडे कशी गेली? या संस्थांकडून विद्यार्थ्यांना , , मध्ये पैशावर थेट प्रवेश देतो म्हणून फोन येत आहेत. आमचे म्हणणे आहे की, आज प्रवेशाच्या नावाखाली फसवणूक होत आहे, उद्या याच डेटाचा वापर करून ऑनलाईन आर्थिक फसवणूक, इंस्टाग्रामवर मुलींना बदनाम करणे असे प्रकार घडू शकतात.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत यांनी माहिती दिली की या घोटाळ्यामागे मोठी साखळी असल्याचा संशय असून

१. सीईटी सेलमधील डेटा हाताळणारे अधिकारी

२. परीक्षा घेणारी तांत्रिक कंपनी

३. डेटा विकत घेणाऱ्या सल्लागार संस्था

४. ठराविक परीक्षा केंद्रांचे मालक

यासर्वांनी मिळून हा गैरप्रकार केला असून याबाबत कारवाई झाली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी पुढील मागण्या करण्यात आल्या

१. तात्काळ  दाखल करून सीईटी सेलचे सर्व्हर लॉग, डेटा एक्सपोर्ट लॉग जप्त करावेत.

२. संशयित परीक्षा केंद्रांचे सीसीटीव्ही फुटेज आणि कॉम्प्युटर लॉग ताब्यात घ्यावेत.

३. १०० पर्सेंटाइल मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या रिस्पॉन्स शीटची फॉरेन्सिक तपासणी करावी.

४. सल्लागार संस्थांचे मोबाईल, लॅपटॉप आणि बँक,  व्यवहारांची चौकशी करावी.

५. हे प्रकरण आंतरजिल्हा असल्याने ,  किंवा सायबर विभागाकडे चौकशी द्यावी.

दोन वर्षे रात्रंदिवस अभ्यास करणाऱ्या गरीब आणि हुशार विद्यार्थ्यांच्या तोंडचा घास हिरावून घेण्याचा हा प्रकार असून, शासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जाईल, असे प्रतिपादन प्रा अजित खरसडे व प्रा विवेक डोके यांनी केले

याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, जिल्हा संपर्कप्रमुख शाम जरे, प्रा नारायण शिनगारे, प्रा अजित खरसडे, प्रा विवेक डोके, प्रा सच्चिदानंद घोणसे, प्रा सुषमा पोळ, प्रा सुप्रिया गांधी, प्रा बाळासाहेब कीर्तने, सुदाम कोरडे, सचिन काकडे, महेश दानवे, प्रशांत कांबळे, दादा ठोंबरे, भीमजी कोकाटे, राजेंद्र राऊत, सद्दाम सय्यद, बापू जगताप, दिलीप लबडे, दिलीप वाळुंज आदींसह विद्यार्थी गायत्री शिरसाठ, श्रेयसी कदम, शर्वरी राऊत, प्रणव सावंत, जान्हवी भागवत, प्रियांका वरडुले, प्रणव कोटलवाड , सार्थक शिनगारे, उत्कर्ष पोटे, सार्थक अंदुरे, ओम पाटील, राज कदम आदींसह शेकडो विद्यार्थी घोषणा देत मोर्चाने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात हजर होते.

जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी आंदोलकांची भूमिका समजून घेतली व सदर तक्रारींची सायबर सेल कडून चौकशी करण्याचे निर्देश दिले असून यासंदर्भात काही गैर बाब आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

## मिरजगाव, नेवासा, राहाता, राहुरीत अवैध गुटखा-मावा विक्रेत्यांवर छापे

बीएनएसच्या कलम १२३, २२३, २७४, २७५ व ३(५) अन्वये ८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मिरजगाव येथे ३ ठिकाणी छाप्यांमध्ये ८० हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींमध्ये धनंजय सातव, सागर गोरे व दादा गदादे (फरार) यांचा समावेश आहे.नेवासा येथे २ ठिकाणी छाप्यांमध्ये ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींमध्ये बाळासाहेब जावळे, अबरार शेख आणि इतरांचा समावेश आहे.राहाता येथे एका ठिकाणी छाप्यामध्ये ३१ हजार ३५० रुपयांचा साठा जप्त करून आरोपी इम्रान तांबोळी, जमीर तांबोळी,व पापाभाई शेख यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.राहुरीत २ ठिकाणी छाप्यांमध्ये १ लाख ७४ हजार ४४ रुपयांचा साठा जप्त करून आरोपी बाबासाहेब गागरे व पवन गिरासे या दोघांवर कारवाई करण्यात आली.

## राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते ग्रीन क्रुसेडर्स आणि अचिव्हर्स पुरस्कार' वितरण

पुरेसे नसून नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पर्यावरणाच्या क्षेत्रात विशेषतः शासन आणि समाजाने एकत्रितपणे काम करण्याची गरज राज्यपाल महोदयांनी व्यक्त केली. पुण्यात करण्यात आलेल्या नाला सुशोभीकरण उपक्रमाचेही राज्यपालांनी कौतुक केले. तंत्रज्ञानाच्या मदतीने नाल्याचे रूपांतर सुंदर, स्वच्छ आणि नागरिकांसाठी उपयुक्त जागेत करता येते, हे या प्रकल्पातून दिसून येते. यामध्ये विक्रेत्यांसाठी जागा उपलब्ध करून देत त्यांच्या उपजीविकेचीही काळजी घेण्यात आली आहे, ही बाब समावेशक विकासाचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. विकासाच्या प्रक्रियेत समाजातील शेवटच्या घटकाचाही समावेश झाला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांचे पर्यावरण संवर्धनासंदर्भात आवाहन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पर्यावरण संवर्धनाच्या आवाहनाची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली. यात भामला फाउंडेशनच्या पर्यावरणविषयक कार्याचे कौतुक करत नागरिकांनी पर्यावरण रक्षणाच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. दरवर्षी फाउंडेशनच्यावतीने पर्यावरणाच्या विविध प्रश्नांवर जनजागृती केली जाते. यंदा प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण, पर्यावरणाची हानी आणि मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती केली जात आहे. प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारावे असे आवाहन श्री. फडणवीस यांनी केले. प्रत्येक नागरिकाचे छोटेसे योगदानही पर्यावरण संवर्धनाच्या व्यापक चळवळीला बळ देऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

**पर्यावरण संरक्षण ही मोहीम नव्हे, संस्कृती बनली पाहिजे : प्रा. राम शिंदे**

पर्यावरण संवर्धन ही केवळ एखादी मोहीम न राहता ती आपल्या जीवनाचा आणि संस्कृतीचा भाग बनली पाहिजे. प्रत्येक नागरिकाने पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वीकारून आपल्या दैनंदिन जीवनातून त्यासाठी योगदान देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.

हवामान बदल हा भविष्यातील प्रश्न नसून आजच्या वर्तमानाचा प्रश्न आहे. वाढते तापमान, बदलते पावसाचे स्वरूप, जलसंकट आणि प्लास्टिक प्रदूषण यांचा परिणाम सर्वांवर होत आहे. त्यामुळे शासनाच्या प्रयत्नांसोबत नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. एक नागरिक पाणी वाचवतो, एक कुटुंब वीज बचत करते, संस्था वृक्षारोपण करते किंवा उद्योग पर्यावरणपूरक पद्धती स्वीकारतो, अशा छोट्या-छोट्या प्रयत्नांतून मोठा बदल घडू शकतो, असे त्यांनी सांगितले.

पर्यावरण संवर्धनाची चळवळ सामान्य नागरिकांचा सहभाग असलेली लोकचळवळ बनली पाहिजे, असेही प्रा. शिंदे यांनी नमूद केले. पर्यावरण वाचवणे म्हणजे निसर्गावर उपकार करणे नव्हे, तर आपल्या आणि पुढील पिढ्यांच्या भविष्यात गुंतवणूक करणे होय, असे सांगत त्यांनी पर्यावरण संवर्धनाला दैनंदिन जीवनशैलीचा भाग बनविण्याचे आवाहन केले. भारताच्या पारंपरिक जीवनपद्धतीत निसर्ग संवर्धनाला विशेष महत्त्व असून, पारंपरिक ज्ञानाची सांगड आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाशी घालण्याची गरज आहे. निसर्गाकडून मिळालेला वारसा पुढील पिढीकडे अधिक समृद्ध स्वरूपात सोपविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. छोट्या-छोट्या पर्यावरणपूरक कृतींचे रूपांतर व्यापक लोकचळवळीत झाल्यास पर्यावरण संवर्धनाला निश्चितच नवी दिशा मिळेल, असा विश्वास प्रा.शिंदे यांनी व्यक्त केला.

**पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाचे छोटे योगदानही महत्त्वाचे : पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे**

निसर्गाचा अमर्याद वापर आणि त्याचा होणारा ऱ्हास यामुळे विविध नैसर्गिक आपत्तींचे संकट वाढत आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने आपले योगदान देणे आवश्यक आहे, असे आवाहन पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

भामला फाउंडेशनच्या पर्यावरण संवर्धनाच्या कार्याचे कौतुक करताना, केवळ मोठ्या कार्यक्रमांपुरते पर्यावरण संवर्धन मर्यादित न ठेवता समाजातील विविध घटकांना सहभागी करून ग्रामीण भागातही पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

वाढत्या कॉंक्रिटीकरणामुळे निसर्गाशी असलेले नाते दूर होत आहे. त्यामुळे विकासाची दिशा बदलून पुन्हा निसर्गाकडे वळण्याची गरज आहे. प्रत्येक छोट्या कृतीचे महत्त्व अधोरेखित करताना रोपवाटप, वृक्षलागवड, पाणी व वीज बचत, साधनसंपत्तीचा विवेकी वापर यांसारख्या कृती पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे मंत्री मुंडे म्हणाल्या.

पर्यावरणासाठी थोडे थांबा, विचार करा आणि संवेदनशील बना असे आवाहन करतानाच छोटे-छोटे बदलच मोठ्या परिवर्तनाची सुरुवात ठरतात, असे  श्रीमती मुंडे यांनी म्हणाल्या.

यावेळी भामला फाउंडेशनच्यावतीने पर्यावरण संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा 'ग्रीन क्रुसेडर्स आणि अचिव्हर्स' पुरस्काराने गौरव करण्यात आला. यामध्ये पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महेंद्र कल्याणकर, अभिनेते जॅकी श्रॉफ, पूनावाला समूहाचे प्रतिनिधी तसेच गोदरेज इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक व गोदरेज ॲग्रोव्हेटचे अध्यक्ष नादिर गोदरेज यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश होता.

भामला फाउंडेशनचे अध्यक्ष आसिफ भामला यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या पर्यावरण संवर्धनाच्या कार्याचा आढावा घेतला.  नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवून पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.